www.rtmnuonline.com



**Bachelor of Arts (B.A.) Part-I (First Semester) Examination**

**MARATHI**

**(Compulsory)**

**(Other Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—**(1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. भारताचे अमरत्व टिकून राहण्याची कारणे सांगून ती पुढे टिकवून ठेवण्यासाठी काय केले पाहिजे, असे साने गुरुजींना वाटते ? 16

**किंवा**

लक्ष्मीबाईना सासऱ्याकडून कोणता सासूरवास सहन करावा लागला, हे सोदाहरण स्पष्ट करा.

2. 'घन:शाम सुंदरा' या भूपाळीत भक्ती आणि प्रभावसमयीचे रम्य वातावरण यांचा अपूर्व संगम साधलेला आहे, कसे ते वर्णन करा.

**किंवा**

बालकवीच्या मनातील उदासीनता 'खेड्यातील रात्र' या कवितेतून कशी प्रगट होते ? 16

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा : 16

**गट 'अ'**

(क) शेतीच्या उत्पादनात वाढ होण्याकरिता जोतीराव फुले यांनी कोणते नियम सांगितले ते लिहा.
(ख) 'भक्ता भेटी' या लीळेचा आशय स्पष्ट करा.
(ग) देवदानवांच्या निर्मितीबद्दल केशवसुतांनी कोणते मत व्यक्त केले ?
(घ) हरिपाठात संत ज्ञानेश्वरांनी 'नामाचा महिमा' कशा प्रकारे वर्णन केला आहे ?

**किंवा**

**गट 'आ'**

(च) राज्याचा बंदोबस्त करताना कोणती उपाययोजना केली असल्याचे अमात्य सांगतात ?
(छ) साहित्यिकांना कोणता संदेश गुरुजींनी दिला आहे ?
(ज) श्रीकृष्णाला प्रात:काल झाला हे सांगण्यासाठी होनाजी बाळांनी कोणकोणत्या गोष्टींचा निर्देश केला आहे ?
(झ) केशवसुतांना 'स्फूर्ति' कशासाठी हवी आहे ?

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा : 16

**गट 'क'**

(त) व्यावहारिक अभ्यासक्रमाची गरज का आहे ?
(थ) 'तडजोडीचे तत्व' संवादव्यवहारात कसे महत्त्वाचे ठरते ?
(द) 'जाहिरातीसाठी लेखन' हा विषय व्यावहारिक मराठीत शिकणे का आवश्यक वाटते ?
(ध) भाषेला 'व्यापक संदर्भ' कसा असतो ?

**किंवा**

**गट 'ख'**

(प) आजच्या काळात भाषांतराचे कोणते महत्व आहे ?
(फ) 'हेतुमूलकता' वर टीपा लिहा.
(ब) सारांश लेखनाची उपयुक्तता स्पष्ट करा.
(भ) संवादव्यवहार संकेताच्याद्वारे कसा होतो ते स्पष्ट करा.


www.rtmnuonline.com

www.rtmnuonline.com

5. पुढील सर्व प्रश्नांची उत्तरे **दोन तथा तीन** वाक्यात लिहा : 16

(1) आधुनिक मराठी कवितेचे जनक कोणाला म्हणतात ? त्यांचे पूर्ण नाव लिहा.

(2) घन:शाम सुंदरा या कवितेत वर्णिलेली श्रीकृष्णाची कोणतीही आठ नावे लिहा ?

(3) 'स्वराज्य रक्षण' या पाठाच्या लेखकाचे पूर्ण नाव काय ? हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ?

(4) 'संस्कृती व साहित्य' या पाठाच्या लेखकाचे पूर्ण नाव काय ? त्यांनी लिहिलेली संस्कृतीची व्याख्या कोणती ?

(5) यशस्वी जाहिरात करण्यासाठी कोणकोणते विशेष प्रगट करण्याची आवश्यकता असते ?

(6) कार्यालयीन कामकाजात वापरल्या जाणाऱ्या भाषेत कोणते गुण असणे गरजेचे आहे ?

(7) भाषिक संवाद व्यवहाराची मूलतत्वे कोणती ?

(8) जे. कृष्णमूर्ती यांनी केलेली संवादाची व्याख्या लिहा.

835 835 835 835 835



www.rtmnuonline.com